**<u>२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम</u>**

नि.दि.दा.क्र.१२९/२०१२
दामोदर बर्गे व इतर विरुध्द
गोरोबा बर्गे व इतर
**निशाणी क्र.९० खाली**

**<u>प्रतिवादी क्र.५ चा साक्षीदार क्र.१ चा उलटतपास वादीतर्फे विधीज्ञ श्री. आय.व्ही.रांजवण यांचेमार्फत शपथेवर सुरु–</u>**

**०५.** हे म्हणणे खरे आहे की, हरीबा यास नामदेव, प्रल्हाद, साहेबराव व दामोदर अशी चार मुले होती. हे म्हणणे खरे आहे की, घाटनांदुर येथे त्यांच्या वडीलांच्या जमीनी होत्या. त्या जमीनीचे सर्वे नंबर मला सांगता येणार नाहीत. हे म्हणणे खरे आहे की, यापूर्वी नि.दि.दा.क्र.८९/१९९८ या चारही भावांनी दाखल केला होता व त्याचा निकाल प्रत्येकी १/४ हिस्सा देण्यात यावा असा दिला होता. त्या निकालावर आम्ही कोणतेही अपील दाखल केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील घाटनांदूर या गावामध्ये कधीही राहिले नाहीत. गट नं.८४९ मधील २ हे. ३८ आर इतकी जमीन सोडून इतर जमीनीमध्ये हे चारही भाऊ १/४ अशा हिस्स्याप्रमाणे वहिवाट करतात. हे म्हणणे खरे नाही की, गट नं.८४९ हा माझ्या वडीलांनी स्वकष्टाने विकत घेतला होता म्हणून आमचा आहे हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडील व त्यांच्या भावांनी एकत्र कुटुंबामध्ये भावाच्या नावावर काही जमीनी विकत घेतल्या होत्या त्या जमीनी मला मिळाव्या म्हणून मी खोटे पुराव्याचे शपथपत्र दिले आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

**<u>उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ४ चे विधिज्ञ श्रीमती ए.बी.खोसे यांचे मार्फत सुरु–</u>**

**०६.** हरीबा यास मुली नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, कौशल्या, वत्सला व सुशीला या माझ्या बहिणी आहेत व कलावती ही माझी आई आहे. नि.दि.दा.क्र.८९/१९९८ याच्या मला, माझ्या बहिणींना व माझ्या आईला कोणत्याही नोटीसा मिळाल्या नाहीत.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

स्वाक्षरीत/–

दिनांक ०१.०७.२०२५

**(श्रीमती ए.एस.मते)**
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
भूम.